# आर्य चाणक्य

**पंडित वामन शास्त्री इसलामपुरकर**

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**आर्य चाणक्य : पंडित वामन शास्त्री इसलामपुरकर**

© सुरक्षित

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. नं.: ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, उद्यमनगर, कोल्हापूर.

**आवृत्ती**
डिसेंबर, २०१२

**किंमत**
रुपये २००/-

# प्रस्तावना...

आर्य चाणक्य हे पुस्तक प्रसिद्ध महाकवि श्रीविशाखदत्त याच्या मुद्राराक्षस नामक नाटकाच्या आधाराने तयार केले आहे. मूळग्रंथाला मुद्राराक्षस असे नाव देण्याचे कारण इतकेच की, मुख्य नायक जो चाणक्य[१] त्याने – आपला प्रतिपक्षी अर्थात् राक्षस याची 'मुद्रा' म्हणजे आंगठी हेराच्या द्वारे आपल्याला हस्तगत झाली तिच्यावरून कपटव्यूह रचून त्याला हरविल्याचे त्यांत वर्णन केले आहे व चाणक्याची मसलत सिद्ध होण्यास मुख्यत्वे राक्षसाच्या मुद्रेचाच उपयोग झाला आहे; म्हणून मुद्राराक्षस असे कवीनें त्या ग्रंथाला नांव दिले आहे. त्या ग्रंथाचे रूप बदलून–अर्थात् दृश्यकाव्याला श्रव्यकाव्याचे किंवा नाटकाला कादंबरीचें[२] रूप देऊन आम्ही ते

---

१. आम्ही चाणक्य मुख्य नायक असे म्हटले आहे. पण मूळ नाटकाचा टीकाकार धुंडिराम धुंडिराम चंद्रगुप्ताला नायक म्हणतो. साहित्य शास्त्राच्या काही नियमांनी ते खरें आहे, तथापि ते नियम नाटकास लागू आहेत. हा ग्रंथ नाटक नव्हे, व आम्हांसही साहित्यशास्त्राचा आधार आहे.

२. कादंबरी हा शब्द मराठीभाषेत मोठ्या चमत्कारिक रितीनें प्रचारांत आला आहे. इंग्रजीत ज्याला 'Novel' म्हणतात. त्याला संस्कृतांत कथा म्हणतात. सामंत तर कथा शब्दाचा विशेष प्रचार नसून त्याच्याबद्दल कादंबरी हा शब्द रूढींत आला आहे. बहुतकरून प्रसिद्ध कवि बाणभट्ट याची कादंबरी ही कथा या नावांत समाविष्ट होणाऱ्या ग्रंथांत मुख्य असल्यावरून तिचेंच नाव प्रचारांत आले असावे असे वाटते.

आर्यचाणक्य नांवानें वाचकांपुढे आणलें आहे. चाणक्य हा या ग्रंथाचा नायक आहे व त्याच्याच प्रयत्नाचा, चातुर्याचा, मसलतीचा व इतर गुणांचा प्रभाव विस्तारपूर्वक यांत वर्णन केला आहे; म्हणून आम्ही आमच्या ग्रंथाला आर्य चाणक्य असे नांव दिले आहे.

या पुस्तकमालेंत यापूर्वी जे ग्रंथ आम्ही तयार केले त्याला विशेष विवेचनपूर्वक उपोद्‌घात वगैरे देण्याचा प्रयत्न केला नाही. कारण त्यातला विषय बहुतकरून साधारण समजुतीच्या वाचकांस देखील समजण्यासारखा व काही अंशी त्यांच्याच उपयोगाचा असल्यामुळें फारशी खटपट न करता थोडक्यांत ग्रंथाचे स्वरूप समजेल इतकीच माहिती देण्याचा क्रम ठेविला होता. पण प्रकृत पुस्तक हे विशेष महत्त्वाचे असून याचा विषय निराळ्या प्रकारचा आहे. सामान्य व विशेष समजुतीच्या सर्व लोकांच्या हे आदरास पात्र होण्यासारखें असल्यावरून विशेष विवेचन केले आहे. तरी ज्याला ते वाचण्याची इच्छा नसेल त्याचा गोंधळ न व्हावा याकरिता उपोद्‌घातरूपाने ते स्वतंत्रच जोडले आहे. पूर्वीप्रमाणेच प्रिय वाचकांनी याचाही प्रेमपूर्वक स्वीकार करावा, अशी त्यांस विनंती आहे.

वा. शा. इ.

# उपोद्घात...

या जगांत प्रत्येक पुरुषाला– मग तो मनुष्य असो, देव असो किंवा दैत्य असो– ज्ञान हे अवश्य पाहिजेच आहे. ते नसलें तर त्याच्या हातून व्यवहार सरळ होत नाहीं, अर्थात त्याला पशूची योग्यता प्राप्त होते. ज्ञान अनेक प्रकारचे आहे व तें होण्याची साधनेंही अनेक आहेत; तथापि लहानथोर सर्वसाधारणाला बहुश्रुतपणा, साधारण विवेचनशक्ति व वर्तन करण्याचा मार्ग उत्तम कोणता ह्याचें ज्ञान अवश्य असलेंच पाहिजे. त्याच्यावाचून अगदी चालत नाही. ते नसलें तर पदोपदीं नुकसान होते, दु:खें भोगावी लागतात, उपहास होतो, असे अनेक अनर्थ प्राप्त होतात. याशिवाय कोणाच्याही मनाची स्थिति सार्वकाळ एकसारखीच रहात नाही. कामक्रोधादि शत्रु त्याला वरचेवर आपल्या ताब्यात घेण्याविषयी प्रयत्न करीत असतात व तसें झालें म्हणजे त्याच्या हातून अनेक अनर्थ घडतात. अशा वेळी ज्ञानाची फारच गरज लागते. ज्ञान असले म्हणजे त्याच्या साह्याने त्या शत्रूंला पिटाळून आपले मन स्थिर ठेवता येतें. तेव्हा एकंदरीत उपयुक्त ज्ञान अवश्य असलेंच पाहिजे असे सिद्ध होते.

जगाचा इतिहास– त्याच्या उत्पत्तीपासून हावेळपर्यंतचा नीट मनन करून पाहिला तर ज्ञान हे दिवसेंदिवस वाढत जात आहे असें दिसून येईल व कोणताही

पुरुष जन्मत:च आवश्यक किंवा विशिष्टज्ञानसंपन्न असण्याचा संभव नाहीं हेही उघडच आहे. तेव्हां त्याला वर सांगितलेले उपयुक्त ज्ञान संपादन करण्याविषयी काहीं साधनें पहावीं लागतात. त्या साधनांत मुख्य साधन म्हटले तर पूर्वीची उदाहरणे– अर्थात् आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या पुरुषांच्या चरित्रांचे लक्ष्यपूर्वक अवलोकन करणें व त्यांतल्या वाईट गोष्टी सोडून चांगल्या गोष्टींचे ग्रहण करणे हे मुख्य होय. सांप्रत उपलब्ध असलेली सर्व काव्ये पाहिली तर ती पूर्वी झालेल्या पुरुषांची चरित्रेच आहेत असे म्हणण्यास काही हरकत नाही. अर्थात् काव्ये लक्षपूर्वक वाचणें हे ज्ञानसंपादनाचे एक मुख्य साधन आहे असे म्हटले पाहिजे. अशा प्रकारची काव्ये मोठमोठ्या विद्वान् व परोपकारी लोकांनी असंख्य करून ठेवली आहेत व त्यांच्यापासून अनुभविक ज्ञान संपादन करून लोक दिवसेंदिवस विशेष प्रकारची सुधारणा करीत गेले हे इतिहासावरून सिद्ध होते.

आता हा काव्यरूपी ज्ञानसंपादनाचा मार्ग कसा सुरू झाला याविषयी थोडेसें विवेचन केले पाहिजे. आर्यलोकांच्या सर्व प्राचीन ग्रंथकारांनी–मनुष्य हे अज्ञानी असून ज्ञानसंपन्न काय ते देव, प्रत्येक गोष्ट देवांनी मनुष्याला दिली अथवा एकंदरीत देव हे मनुष्याचे मार्गदर्शक, असे वर्णन केले आहे. जसे ज्योतिष, वैद्यक, न्याय, व्याकरण इत्यादि ज्ञानाचीं साधनें जी शास्त्रें ती प्रथम देवांनी मनुष्याला दिली असे वर्णन आहे, त्याप्रमाणे काव्येही प्रथम देवांनीच रचून दाखविली असे प्राचीन ग्रंथकार वर्णन करितात. जगाचा आदिपुरुष जो ब्रह्मदेव तो पहिला कवि असे प्राचीन ग्रंथांत अनेक ठिकाणी वर्णन केले आहे. ब्रह्मदेवाची कविता म्हटली म्हणजे वेद हे होत. ब्रह्मदेवानंतर इतर देवही कविता करीत असत. तथापि ती पुष्कळ वर्षेपर्यंत मनुष्याला प्राप्त झाली नव्हती.

मनुष्यांत पहिला कवि वाल्मीकऋषि. वाल्मीकाला ब्रह्मदेवानें कविता करण्याविषयी परवानगी दिली व नंतर त्याने काव्य करण्यास प्रारंभ केला. त्याचे काव्य म्हटले म्हणजे रामायण. अयोध्येचा राजा दशरथ याचा पुत्र श्रीरामचंद्र त्याचे चरित्र कविताबद्ध रचून वाल्मीकाने मनुष्यमात्राला रामायणरूपी अनुभविक ज्ञान संपादनाचा एक मोठा मार्ग तयार करून दिला व त्यानंतर व्यास, गुणाढ्य, कालिदास इत्यादि मोठमोठ्या कवींनी अनेक काव्यें रचली व त्यांपासून पुढच्या संततीला अनेक लाभ झाले.

येथवर आम्ही जे वर्णन केले आहे ते श्रव्य अर्थात् केवळ ऐकण्यास योग्य

अशा काव्यांविषयींचेच आहे. कारण अनुभविक ज्ञान मिळण्यास साधनीभूत अशीं जी चरित्रे तीं केवळ ऐकूनच त्यापासून ज्ञान मिळविण्याची पुष्कळ दिवस रूढि चालली होती; पण पुढें ऐकण्यापेक्षा प्रत्यक्ष पाहिल्याने लौकर व उत्तम प्रकारे ज्ञान प्राप्त होईल अशी समजूत झाल्यावरून दृश्यकाव्यें– अर्थात् ज्या काव्यांत ज्या नायकाचे जसे चरित्र वर्णन केले असेल तसा पात्रद्वारा त्याचा अभिनय करून पाहण्याचा मार्ग सुरू झाला. जशी श्रव्यकाव्यांची सुरवात ब्रह्मदेवापासूनच झाली तशीच या दृश्यकाव्यांचीही सुरवात त्याच्या पासूनच झाली. ब्रह्मदेवाने प्रथम वेदरूपी जे श्रव्यकाव्य केले होते त्यांतलें सार काढून त्याने नंतर नाट्यवेद अर्थात् नाटक करण्याचे शास्त्र उत्पन्न केले. ब्रह्मदेवानें जी कविता केली तिला वेद असे म्हणण्याचा संप्रदाय असल्यावरून त्याने जे नाटकाचे वर्णन केले त्यालाही नाट्यवेदच म्हणू लागले. ब्रह्मदेवाने नाटके रचून मात्र तयार केली तरी त्यांचा प्रयोग झाला नव्हता. तो भरतमुनीने सुरू केला. त्यावेळी ब्रह्मदेवाने तांडवनृत्य व पार्वतीने लास्यनृत्य ही उत्पन्न केली. त्यानंतर देवलोकांत नाटकाचा परिपाठ पडत गेला. भरतमुनीने अनेक नाटकांचे प्रयोग केल्याचे पुष्कळ ग्रंथांत वर्णन केले आहे. याप्रमाणे प्रयोग करण्याची रीत सुरू झाल्यापासून पूर्वी जी केवळ श्रव्यकाव्येच होती त्याठिकाणी नंतर दृश्य आणि श्रव्य अशी दोन प्रकारची काव्ये होऊं लागली.

श्रव्यकाव्ये जशी देवापासून सुरू झाली तशीच दृश्यकाव्येही त्यांच्यापासूनच झाली हे वर सांगितलेंच आहे. श्रव्यकाव्य करणारा जसा वाल्मीक हा प्रथमच आहे तसा दृश्यकाव्य करणारा मनुष्यलोकांत प्रथम कोण झाला याविषयी मात्र प्राचीन ग्रंथांत म्हणण्यासारखा काही आधार मिळत नाही. आजकाल जितकीं दृश्यकाव्ये अर्थात् नाटकें वगैरे उपलब्ध आहेत त्यांत कालिदासाच्या पूर्वीच्या कोणाही नाटककाराचा ग्रंथ आढळत नाही. भास, सौमित्र, कविपुत्र[१] इत्यादी पूर्वी नाटककार होते असा फक्त उल्लेख मिळतो; पण त्यांचे ग्रंथ मिळत नाहींत. दृश्य काव्याचे नियम वगैरे फार थोडे आहेत व ते देवांनी करून दिले असल्याचे कोठे आढळतही नाही; पण नाटकादिकांचे नियम फार आहेत व ते प्रथम देवांचा नाट्याचार्य जो भरतमुनी त्याणें रचिल्याचें प्रसिद्ध आहे. त्याच्यानंतर नाट्याचे नियम करणारे पुष्कळ झाले तरी त्या सर्वाला मुख्य आधार काय तो भरतमुनीच्या ग्रंथाचाच आहे.

---

१. संस्कृत मालविकाग्निमित्र नाटकाची प्रस्तावना पहा.

आज नाटकग्रंथाची जी सुधारणा व अनेक विशेष प्रकारचे नियम दिसून येतात ते अगदी पहिल्या प्रथमपासून– म्हणजे दृश्यकाव्याची सुरवात झाली तेव्हापासून, चालू झाले होते असे दिसत नाही. प्रथम काही एकाद्या प्रसंगावर कविता रचून त्या गाऊन दाखविण्याची प्रवृत्ति पडली असावी व त्यानंतर अभिनयाची प्रवृत्ति होऊन निरनिराळी पात्रें व त्यांचे परस्परांशी वर्तन वगैरे प्रकार सुरू होऊन नंतर त्याविषयी विशेष प्रकारचे नियम वगैरे झाले असावे. याविषयीं विवेचनपूर्वक प्राचीन ग्रंथ अवलोकन केले असता भरपूर माहिती मिळते. सर्व काव्यांत रामायण हे आदिकाव्य असें वर सांगितलेच आहे. रामायणांत नाटकप्रयोगाचा कोठेंच उल्लेख मिळत नाही. वाल्मीकाने आपण केलेलें काव्य अर्थात् रामायण आपले शिष्य कुश आणि लव यांच्याकडून तालसुरावर रामाच्या सभेंत गावविल्याचा उल्लेख उत्तर कांडांत आहे.[१] तसेंच 'नट' व 'नर्तक' हे शब्दही त्यांत आढळतात.[२] रामाच्या यज्ञांत 'नट' व 'नर्तक' आले होते असे वर्णन आहे तथापि ते एखादा प्रसंग घेऊन गाणारे व अभिनय करणारे असावेत असें वाटते. नाटकाचा प्रयोग करण्याची रीत भरतमुनीनेंच सुरू केली असा आधार मिळतो. भवभूतीनें उत्तररामचरितांत वाल्मीकानें नाटक रचिलें असून त्याचा भरतमुनींने अप्सरांकरवीं प्रयोग करविला होता असे वर्णन केले आहे. ते कसेंही असो; भरतमुनीपासून[३] नाट्याची सुरवात झाली, असें म्हणण्यास काही बाध नाहीं.

✦✦✦

---

१. याविषयी बा. रा. उ. कां. सर्ग १०६–१०७ यांत सविस्तर वर्णन आहे.

२. वाल्मिकी रामायण उ. कां. सर्ग १०४ श्लोक १५ पहा.

३. याविषयी संस्कृत उत्तररामचरिताच्या ४ थ्या अंकांतले अकरावें अध्यात आम्ही केलेल्या करुणरावनाचे पृ. १०९ यावरील लवाचें भाषण पहा.

# नाटकग्रंथांविषयीं...

यावरून नाटक[१] या नांवाचा ग्रंथ कसा असतो, त्याचे स्वरूप, त्याचे नियम, त्याची रचना वगैरे कशी असते, हे समजून घेण्यास संस्कृत भाषेवांचून विज्ञान जगांतल्या दुसऱ्या कोणत्याही भाषांत साधन नाहीं, असे म्हणण्यास काही हरकत दिसत नाही. सांप्रत व दोन तीन शतकांपूर्वी[२] केवळ देशभाषेत – म्हणजे संस्कृत नाटकांचा आधार न घेतां– नाटकें रचण्यात आली आहेत तरी तीं अगदी स्वतंत्र म्हणतां येत नाहीत. त्यांच्या कर्त्यांनी संस्कृत कवींनीं रचलेल्या कोणत्याही एखाद्या नाटकाचें भाषांतर केले नसले तरी त्यांच्या कल्पना व त्यांची रचना संस्कृतांतूनच घेतली आहे असे म्हटले पाहिजे. तेव्हां नाटकग्रंथ हे संस्कृत

---

१. नाटक हा शब्द केवळ सर्वसामान्य घेतला आहे व त्यावरून एकदंरींत दृष्यकाव्यांचे भाण, प्रहसन इत्यादि जे पांठभेद आहेत त्यांचाही येथे या शब्दांत आम्हीं समावेश केला आहे असे समजावे.

२. सावित्री, तैलंगी इत्यादि भाषांत फार जुन्या काळीं नाटकग्रंथांची स्वतंत्र रचना झाली असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र, गुजराथी, बंगाली इत्यादि भाषांत मात्र इंग्रजी शिक्षणाची सुरवात झाल्यावर व मुद्रणकला प्रसार पावल्यावर नाटकग्रंथाची रचना झाली आहे.

भाषेवांचून या भरतखंडांतल्या कोणत्याही देशभाषेंत स्वतंत्र रितीनें रचल्याचें आढळून येत नाहीं असे सिद्ध होते.

तसेच वाङ्मयाचा उदय प्रथम भरतखंडांत झाला असून तेथून त्याचे किरण चहूंकडे फांकले ही गोष्ट अगदी निर्विवाद आहे.

सांप्रत पाश्चात्य लोकांचा अनायासें विशेष सहवास झाला असून त्यांच्या भाषांतील ग्रंथांचे आम्हांस चांगलें परिशीलन होऊं लागले आहे. त्यामुळे अगदीं अलिकडच्या काळांत अनेक नाटकें त्यांच्या पद्धतीवर रचलीं असल्याचे दिसून येते व त्यावरून पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे की, सांप्रत नाटकग्रंथ रचण्याच्या कामांत विशेष सुधारणा झाली आहे. देशभाषेंत नाटक रचणाऱ्या कोणत्याही ग्रंथकाराला पूर्वी संस्कृत नाटकाचें अनुकरण करावे लागत होते. त्या ऐवजी आता पाश्चात्य नाटकांची रीत घ्यावयास मिळते. यामुळे एक नवी व स्वतंत्र पद्धत आपल्या भाषेंत आणण्यास चांगली सवड झाली हे त्यांचे म्हणणे फार थोड्या अंशाने कबूल करता येईल, पण जशी संस्कृत भाषेंत नाटकग्रंथांची स्वतंत्र रितीने उत्पत्ति झाली, तशीच युरोपिअन भाषांतही त्यांची स्वतंत्र रितीने उत्पत्ति झाली आहे, असे जे कित्येकांचे म्हणणे आहे ते मात्र कबूल करता येत नाही. कारण इंग्लिश, जर्मन, फ्रेंच इत्यादि भाषांत जी अनेक काव्ये व नाटके झालीं आहेत त्यांची रचना काही निराळ्या प्रकारची आहे. तथापि त्याची कल्पना मुळीं संस्कृत भाषेच्याच द्वारानें त्यांना प्राप्त झाली असावी असे वाटते. फ्रेंच, इंग्लिश, जर्मन वगैरे लोकांनी ज्या विद्या आणि कला संपादन केल्या त्या बहुतकरून ग्रीक व रोमन या लोकांपासूनच घेतल्या आहेत, हे ते लोक उघडपणे कबूल करितात. ग्रीक लोकांचा आम्हां आर्यलोकांशी अगदीं निकट संबंध आहे. अलेकझाँडर वगैरे भरतखंडावर स्वाऱ्या करणाऱ्या प्रतापी पुरुषांनी या देशांतून हजारों संस्कृत ग्रंथ व अनेक पंडित आपल्या देशांत नेले होते, हें इतिहासप्रसिद्ध आहे. यावरून पाहतां नाटक[१] ही कल्पना संस्कृत भाषेच्या द्वारे ग्रीक लोकांना प्राप्त झाली व त्यांच्याकडून रोमन लोकांना प्राप्त होऊन त्यांच्याकडून इंग्लिश, फ्रेंच वगैरे लोकांनी घेतली यांत काही संशय नाहीं. यावरून कोणी अशी शंका काढील की वर लिहिल्याप्रमाणे कदाचित् मानतां येईल; पण ग्रीक लोकांच्या कारकिर्दीत संस्कृत भाषेत नाटकग्रंथ होते की काय? या संशयाचे निराकरण

---

१. नाटक हा शब्द उपलक्षणार्थ आहे. यावरून वाङ्मय अथवा इंग्रजीत ज्याला Literature म्हणतात त्याचें ग्रहण केलें आहे.